# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF /AZ /U / 125 / 2008 / 46**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Akolkar Shankar Kushaba, Plot No.18, Vrindavan colony, Satara area, Aurangabad (Consumer No. 490011284628 )

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Akolkar Shankar Kushaba, Plot No.18, Vrindavan colony, Satara area, Aurangabad

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 0.9.09.2008 at 12.00 Hrs.**

**Encl As above**.

Copy to :
Shri Akolkar Shankar Kushaba
Plot No.18, Vrindavan colony,
Satara area, Aurangabad

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२५/२००८/४६**

**तक्रार दाखल दिनांक ;- २६/०८/२००८**
**निकाल दिनांक ;- २०/१०/२००८**

**श्री अकोलकर शंकर कुशाबा,**
**प्लॉट नबंर १८,वृंदावन कॉलनी,**
**सातारा परीसर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११२८४६२८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २६/०८/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०९/०९/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारी नुसार त्यांचे घर बंद असल्यामुळे व थकबाकीमुळे महावितरण कंपनीने त्यांचा वीज पुरवठा खंडीत केला होता. दिनांक ०६/०८/२००४ रोजी त्यांनी वीज पुरवठा पुर्नजोडणी करून द्यावा यासाठी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे अर्ज केला. त्यावेळी त्यांना २०,०७२/- रूपयाचे थकबाकीचे वीज बिल देण्यात आले,ज्यापैकी काही रक्कम भरल्यानंतर दि. २९/१०/२००४ रोजी त्यांचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात आला. महावितरण कंपनी तर्फे पुढील काळात त्यांना सतत चुकीचे वीज बिलाची आकारणी करण्यात आली तरीही वीज पुरवठा खंडीत होईल या भितीपोटी त्यांनी अनेकदा पार्ट पेमेंट केल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनी तर्फे जेव्हा त्याचा खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात आला (पी.डी.टू लाईव) त्यावेळेस जून्या मिटरवरील रिडींग हा वीज वापर ग्रहीत धरून त्यांना वीज बिल आकारण्यात आले. या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीस दाद न मिळाल्यामुळे त्यांनी मंचास ही तक्रार दाखल केली आहे.

२) दिनांक २६/०८/२००८ रोजी झालेल्या पहील्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री शंकर अकोलकर तसेच महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर व छावणी विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री गायकवाड उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी संबंधीत विभागाकडुन कागद पत्रे उपलब्ध झाली नसल्यामुळे जबाब दाखल करू शकत नसल्याचे सांगितले व सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिका-याची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी दिनांक १६/०९/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक १६/०९/२००८ रोजी औरंगाबाद येथे होणा-या मंत्री मंडळ बैठकीच्या तयारीत व्यस्त असल्यामुळे सुनावणीस उपस्थित राहु शकत नसल्याचे नोडल अधिकारी यांनी कळविले व तारीख वाढविण्याची मंचास विनंती केली.मंचाने पुढील सुनावणी २३/०९/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक २३/०९/२००८रोजी अर्जदार व नोडल अधिकारी सुनावणीच्या वेळी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे वीज बिल दुरूस्त केल्याचे सांगत त्यांना ९३६.२४/- रूपयाचे वीज बिलात क्रेडीट देण्यात आल्याचे सांगितले. नोडल अधिकारी यांनी आपल्या जवाबासोबत इतर कोणतेही कागत पत्रे जोडली नसल्यामुळे त्यांना स्थळ पाहणी अहवाल तसेच वीज पुरवठा कायम स्वरूपी खंडीत केल्याचा अहवाल,पुर्नजोडणी करतांनाचा अहवाल तसेच सी.पी.एल. ईत्यादी कागद पत्रे पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याचे सांगण्यात आले व सुनावणीची तारीख ३०/०९/२००८ अशी ठेवण्यात आली.

५) दिनांक ३०/०९/२००८ रोजी नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे सी.पी.एल.व वीज बिल रिव्हीजन या बाबत ते योग्य ते स्पष्टीकरण न करू शकल्यामुळे व अर्जदाराने यासाठी संबंधीत कार्यालयाकडे जाण्याची तयारी दर्शविल्यामुळे नोडल अधिकारी यांना अर्जदारास वीज बिल रिव्हीजन कशा पध्दीतीने केली आहे,हे दाखवून देण्याबाबत सांगितले व अर्जदारास याबाबत आक्षेप असल्यास ते पुढील सुनावणीच्यावेळी दाखल करण्याचे सांगण्यात आले. व पुढील सुनावणी ०७/१०/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

६) दिनांक ०७/१०/२००८ रोजी अर्जदारास महावितरण कंपनीने केलेल्या वीज बिल दुरूस्तीबाबत आक्षेप नसल्याचे सांगितले पण त्यात आकारण्यात आलेल्या मिटर कॉस्ट,व्याज दंड हे कमी करण्यात यावे अशी विनंती मंचास केली.

७) दोन्ही बाजुकडून मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरून व सी.पी.एल. वरून असे आढळुन येते की, अर्जदाराचा वीज पुरवठा जेव्हा कायमस्वरूपी खंडीत करण्यात आला होता, तेव्हा त्यावेळी लावण्यात आलेल्या मिटरवर (क्रमांक ३०२५६७९) रिडींग १२५० युनिट अशी होती.दि.२९/१०/२००४ रोजी

त्याचा कायमस्वरूपी खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात आला. अर्जदाराने दिनांक ०४/०९/२००६ रोजी तसेच १५/१२/२००६ रोजी पत्राव्दारे त्यांना जुन्या मिटरवरील रिडींग ही वीज वापर म्हणून ग्रहीत धरून चुकीचे वीज बिल आकारले असल्याचे महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाच्या निदर्शनास आणुन दिले व सुधारीत वीज बिल देण्याचे मागणी केली असल्याचे दिसून येते. यावरून अर्जदाराचा कायमस्वरूपी खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्नजोडणी करतांना त्यांच्या येथे जुनेच मिटर लावल्याचे आढळून येते. नोडल अधिकारी यांनी देखील ही बाब मान्य असल्याचे आपल्या जवाबात म्हटले आहे. दिनांक ०१/०२/२००७ रोजी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर महावितरण तर्फे स्थळ पाहणी करण्यात आली. या अहवालाचे अवलोकन केल्यावर त्यात नमुद केलेला मिटर क्रमांक हा जुन्या मिटर क्रमांकाशी तंतोतंत जुळत असल्याचे दिसून येते यावरून वीज पुरवठा पुर्नजोडणी करत असतांना अर्जदाराचे मिटर बदलण्यात आले नसल्याचे स्पष्ट होते. महावितरण कंपनीतर्फे करण्यात आलेल्या या स्थळ पाहणी अहवालात अर्जदार हे वीजेचा वापर वाणिज्य वापरासाठी करत असल्यामुळे त्यांना २९/१०/२००४ च्या पुढील काळाचे वीज बिल हे वाणिज्य वापराच्या दराप्रमाणे करावे असा शेरा या स्थळ पाहणी अहवालात देण्यात आला आहे. अर्जदाराने देखील ते मान्य केल्यामुळे व नोडल अधिकारी यांनी देखील वाणिज्य वापराचे वीज बिल आकारण्यासाठी हीच तारीख ग्रहीत धरली असल्यामुळे मंच त्यास मान्यता देत आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास लावण्यात आलेली वीज बिलातील व्याज हे जुन्या थकबाकीवर लावण्यात आले असल्यामुळे व अर्जदाराने त्याकाळात वीज बिलाचा भरणा केलेला नसल्यामुळे ते रद्द करण्याची अर्जदाराने केलेली मागणी मंच नामंजुर करीत आहे. त्याचप्रमाणे पुर्नजोडणी करतांना अर्जदाराकडुन घेण्यात आलेली मिटर कॉस्टची रक्कम ही त्या काळातील प्रचलीत नियमानुसार योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

महावितरण कंपनीतर्फे देण्यात आलेले सुधारीत वीज बिल अर्जदारास मान्य असल्यामुळे व अर्जदाराने केलेली तक्रार ही समोपचाराने सुटल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१२५/२००८/४६** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री अकोलकर शंकर कुशाबा,**
**प्लॉट नबंर १८,वृंदावन कॉलनी,**
**सातारा परीसर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११२८४६२८)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१२५/२००८/४६ )

आपण दिनांक २६/०८/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**